# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-२९३ दिनांक - १०/०८/२०२४

## दोन महिला व एक पुरुष वेश्यादलालांच्या ताब्यातुन पाच पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.

दि. ०९/०८/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारकडून महिला नामे रुही सिध्दीकी हि वेश्याव्यवसाय करीत असुन तिचा मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, तिची साथीदार मधु उर्फ महेक जहान खान हिचेकडे काम करणारी मुलींचे व्हाटसॲपव्दारे पुरुष गिऱ्हाईकाना फोटो पाठवुन, पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकांना तिचे चारचाकी क्रेटा गाडीने मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल रुही सिध्दिकी हिने सांगितल्याप्रमाणे एक्वा ढाबा रेस्टोबार, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, रायकरवाडी, काशिमिरा, ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १६.५८ वा. छापा टाकला असता, यातील महिला वेश्यादलाल नामे १) रुही लियाकत सिध्दीकी, वय-२६ वर्ष, सध्या रा. रुम नं. ३३, बिल्डींग नं. ए/५ ग्रीन फिल्ड बिल्डींग, पुनम नगर, जोगेश्वरी पुर्व, मुंबई, मुळ रा. दिल्ली व तिची साथीदार २) श्रीमती मधु उर्फ महेक जहान इर्शाद अहमद खान, वय-४३ वर्ष, रा. मिरारोड पुर्व, ३) मनोजकुमार भल्लाप्रसाद रावत, वय ४० वर्ष रा. मिरारोड पुर्व यांनी आपसात संगणमत करुन वेश्यादलाल मधु उर्फ महेक जहान हिची नावे असेलेली होन्डाई कंपनीची क्रेटा कारने ०५ पिडीत मुलींना आणुन वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम वेश्यादलाल रुही सिध्दीकी हिने स्वीकारल्याने त्यांना सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकुण १०,६६,१५०/- रु किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेवुन ०५ पिडित मुलींची सुटका केली आहे. सदर बाबत ताब्यातील महिला वेश्यादलाल १) रुही लियाकत सिध्दीकी, वय-२६ वर्ष, व तिची साथीदार २) मधु उर्फ महेक जहान इर्शाद अहमद खान, वय-४३ वर्ष, ३) मनोजकुमार भल्लाप्रसाद रावत, वय ४० वर्ष यांच्याविरुध्द सफौ/रामचंद्र पाटील सरकार तर्फे फिर्यादी दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. I ४१९/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक १०/०८/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, राजु भोईर, रामचंद्र पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव व मसुब/अश्विनी वाघमारे, सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.